## 1) 3054-2301 जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2) 3054-0363 जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी) अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी उपयोजना 3) ग्रामीण क वर्ग तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाचे नियोजनाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

### प्रस्तावना :-

जिल्हा व नियोजनाचा अधारभूत घटक मानून जिल्हा नियोजनासाठी प्रत्येक जिल्हयात **जिल्हा नियोजन समिती** कार्यरत आहे. जिल्हयाचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली असलेली जिल्हा नियोजन समिती जिल्हा योजनेची आखणी करते व सदरची योजना मा. मंत्री (नियोजन) यांचेबरोबर चर्चा करुन अंतिम केली जाते.

### जिल्हा योजनेची कार्यप्रणाली :-

जिल्हा योजनेवरुन प्रस्तावीत योजनेवर निधीचे वाटप प्रशासकीय विभागनिहाय करुन सदरची रक्कम संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यांत येते व सदर निधी अर्थसंकल्पित करुन घेणे, निधीचे वाटप जिल्हास्तरापर्यंत करणे, योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे व त्याचे समन्वयन, संनियंत्रित करणे इत्यादी बाबी प्रशासकीय विभागामार्फत केल्या जातात.

### जिल्हा वार्षिक योजनेची उदिदष्टे :-

जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करतांना मानव विकास निर्देशांक उंचावणे, जिल्हयाच्या मुलभूत गरजा, सामाजिक व भौगोलिक व्याप्ती यांचा विचार करण्यांत येतो.

**(संदर्भ :- नियोजन विभागाचे शासन निर्णय दिनांक 16 फेब्रुवारी, 2008 अन्वये)**

# <u>योजनेचे नांव :- ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम</u>

**प्रस्तावना :-**

सामाजिक न्याय विभागातर्फे राबविण्यांत येणाऱ्या दलीत वस्ती कार्यक्रमाच्या धर्तीवर शासनाने ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम ही योजना सन 2004-05 पासून राबविण्यांत येत होती. परंतु, आदिवासी विकास विभागाचे शा.नि. दिनांक 26 जून, 2007 अन्वये शासनाने ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारीत कार्यक्रम योजनेला सन 2007-08 पासून सुधारीत कार्यपद्धतीनुसार राबविण्यांस मान्यता दिलेली आहे.

**योजनेबाबत मार्गदर्शक सुचना :-**

संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी ग्रामीण/ नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्रे, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा/ मिनी माडा क्षेत्र, प्रस्तावित माडा/ मिनी माडा क्षेत्र तसेच आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रातील 50 टक्के पेक्षा जास्त आदिवासींची लोकसंख्या असलेल्या वस्त्या/ पाडे/ वाडया/ गावांच्या विकासासाठी या भागातून वस्त्या/ पाडे/ वाडया/ गावे यांची निश्चिती करुन कामे सुचविण्यांत येतात. सदर कामे प्रस्तावित करतांना ती कामे घेणे आवश्यक असल्याची खात्री करुन घेण्यांत येते व तसा प्रस्ताव तयार करुन प्रकल्प अधिकारी हे संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचेकडे सादर करण्यांत येतो.

**योजनेची उदिदष्टे :-**

या योजनेंतर्गत मुख्य वस्तीपर्यंत जोडरस्ते, सिमेंट कॉंक्रीट/ डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, शाळेचे कंपाऊंड बांधकाम, बंद गटार बांधणे, नाल्या-मोऱ्या बांधणे, समाजमंदिर बांधणे, स्मशानभुमी बांधकाम व इतर कामे प्रस्तावित करता येतात.

**(संदर्भ :- आदिवासी विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक 16 जून, 2007 अन्वये)**

## 1) “डावी कडवी विचारसरणीग्रस्त जिल्हयांसाठी अतिरिक्त केंद्रिय सहाय्य” योजना.
## 2) “नक्षलग्रस्त भागाच्या विकासाचा विशेष कृती कार्यक्रम (समन्वय)” योजना.

### प्रस्तावना :-

योजना आयोग, भारत सरकार यांचे मार्फत देशातील निवडक आदिवासी व मागास जिल्हांसाठी **एकात्मिक कृती आराखडा कार्यक्रम** सन 2010-11 ते 2012-13 पर्यंत राबविण्यांत आलेला आहे. आता या योजनेच्या/ कार्यक्रमाच्या स्वरुपामध्ये बदल करुन तो नव्या स्वरुपात सन 2013-14 पासून डावी कडवी विचारसरणीग्रस्त जिल्हयांसाठी “**अतिरिक्त केंद्रिय सहाय्य**” म्हणून बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या उर्वरित कालावधीकरिता राबविण्यांत येत आहे. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर व भंडारा या चार जिल्हयांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

### योजनेबाबत मार्गदर्शक सुचना :-

“डावी कडवी विचारसरणीग्रस्त जिल्हयांसाठी अतिरिक्त केंद्रिय सहाय्य” योजना केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त निधीच्या आधारे जिल्हास्तरीय समितीच्या सभेमध्ये कामांना मंजूरी देवून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येते. तद्नंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, जि.प. कडून कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यांत येते.

### योजनेची उदिदष्टे :-

जिल्हयातील विशेषत: नक्षलग्रस्त भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यांत आलेल्या जिल्हा समन्वय समितीद्वारे सामुहिक लाभाच्या योजना/ सुविधा निवडून स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीचे निराकरण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यांत येते.

## लेखाशिर्ष 3054-2419 रस्ते पुल दुरुस्ती व परिरक्षण कार्यक्रम (प्रपत्र-अ,ब,क,ड)

**प्रस्तावना :-**

सन 2012-13 या वर्षापासून जिल्हा परिषदेच्या रस्त्यांच्या दुरुस्ती व परिरक्षण हा कार्यक्रम “3054” या लेखाशिर्षांतर्गत निधीसह ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरित करण्यांत आलेला आहे. सदर योजना यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्यांत येत होती. सन 2012-13 या वर्षापासून सदर योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यांत येणार असल्याने “3054” या लेखाशिर्षांतर्गत कामांसंदर्भात सर्वसमावेशक धोरण ठरविणे आवश्यक आहे, त्यानुसार यावर्षीपासून अंमलात आणावयाच्या कार्यवाही संदर्भात निर्णय घेण्यांत आला आहे.

**योजनेबाबत मार्गदर्शक सुचना व उदिदष्टे :-**

**गट-अ - रस्ते वाहतुकी योग्य राखण्याची कामे :-**

1. या योजनेंतर्गत मंजूर करावयाचा कार्यक्रम हा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) यांच्या स्तरावर मंजूर करण्यांत यावा.
2. यामधील सर्व कामे खात्याच्या मजुरांमार्फतच करण्यांत यावी.
3. जर कंत्राटदार नेमून ही कामे करावयाची असतील तर त्याला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची लेखी पूर्वपरवानगी आवश्यक राहील अशी पूर्वपरवानगी देतांना त्याची कारणमिमांसा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अभिलेख्यात नोंदवावी.
4. या गटाखालील एकूण कामांची किंमत मंजूर कार्यक्रमाच्या 15 टक्के पर्यंतच्या मर्यादेतच मंजूर करता येतील.

**गट-ब - रस्त्याच्या दर्जा टिकविण्याची/ सुधारण्याची कामे :-**

1. हा कार्यक्रम शासन स्तरावरुन मंजूर करण्यांत येईल.
2. या गटाखालील एकूण कामांची किंमत मंजूर कार्यक्रमाच्या 70 टक्के पर्यंतच्या मर्यादेतच मंजूर करता येईल.
3. या गटामध्ये पुढील प्रकारची कामे करणे अभिप्रेत आहे - अ) रस्त्याची विशेष दुरुस्ती/ सुधारणा, ब) डांबरी नुतनीकरण, क) थेट रस्ते नुतनीकरण, ड) थेट रस्ते सुधारणा, इ) खडी नुतनीकरण, इ.

**गट-क - विशिष्ट प्रयोजनाची कामे :-**

1. हा कार्यक्रम शासनाची पूर्व सहमती घेवून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावर मंजूर करता येईल.
2. या गटाखालील एकूण कामांची किंमत मंजूर कार्यक्रमाच्या 10 टक्के पर्यंतच्या मर्यादेतच मंजूर करता येईल. सदर प्रस्ताव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत शासनास सादर करावा.
3. या गटामध्ये पुढीलप्रमाणे कामे करणे अभिप्रेत आहे - अ) अपघातप्रवण क्षेत्रांची सुधारणा, ब) अपघातप्रवण क्षेत्रांची सुधारणा वगळून अन्य अभियांत्रिकी सुधारणा, क) कमकुवत पुलांची तसेच मोठया पुलांची दुरुस्ती/ मजबुतीकरण, ड) गावे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी मुरमी रस्त्यांचे खडीकरण, इ) लहान मोऱ्यांची सुधारणा, इ.

**गट-ड - अन्य संकिर्ण कामे :-**

1. हा कार्यक्रम अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या पूर्व सहमती नंतर कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, यांच्या स्तरावर मंजूर करता येईल.
2. या गटाखालील एकूण कामांची किंमत मंजूर कार्यक्रमाच्या 5 टक्के पर्यंतच्या मर्यादेतच मंजूर करता येईल.

याप्रमाणे सदर योजनेची अंमलबजावणी करण्यांत येते.

# जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत संबंधित विभागाकडून राबविण्यांत येणाऱ्या योजना

# 1) 8 - आरोग्य, 2) 3 - शिक्षण, 3) 12 - पशुसंवर्धन

**योजनेची कार्यप्रणाली :-**

जिल्हा वार्षिक योजनेमधून प्रस्तावित योजनेवर मा. जिल्हाधिकारी यांचेद्वारे निधीचे वाटप संबंधित विभागाकडे करुन झाल्यानंतर संबंधित प्रशासकीय विभागाकडून सदर निधी अर्थसंकल्पित करुन घेणे, निधीचे वाटप जिल्हास्तरापर्यंत करणे, योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे व त्याचे समन्वयन, संनियंत्री करणे, इत्यादी बाबी संबंधीत प्रशासकीय विभागामार्फत केल्या जातात. संबंधित विभागाने कार्यान्वित यंत्रणा म्हणून ज्या विभागाने दिले असेल त्या विभागाने मंजूर कामांची निविदा काढून करारनामा कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता यांचे नियंत्रणाखाली कामे करण्यांत येतात.

**शिक्षण योजनेची उदिदष्टे :-**

प्राथमिक शाळांच्या इमारतीच्या विशेष दुरुस्ती करणे, प्राथमिक शाळांचे इमारत बांधकाम करणे व जि.प. हायस्कूल इमारत बांधकामांसाठी उपलब्ध निधी खर्ची घालण्यांत येतो. तसेच पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरुस्ती व इतर किरकोळ कामे 12 - पशुसंवर्धन या लेखाशिर्षामध्ये करण्यांत येतात. लेखाशिर्ष 8 - आरोग्य अंतर्गत आरोग्य विभागातील मंजूर असलेले बांधकाम व किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यांत येतात.

# <u>पर्यटन स्थळ विकास कार्यक्रम (वर्ग “क”)</u>

**प्रस्तावना :-**

जिल्हयात ऐतिहासिक वारसा स्थळे व किल्ले, विविध निसर्गरम्य स्थळ, पुरातन वास्तु, लेण्या, तिर्थस्थळे, विविध पर्यटन स्थळे पर्यटकांना पाहता यावीत व जिल्हयातील संस्कृतीचा परिचय वृदधींगत व्हावा त्या दृष्टिकोनातून पर्यटनास चालना मिळण्यासाठी व लोकांमध्ये पर्यटनाची आवड निर्माण व्हावी त्या हेतूने शासन निर्णय दिनांक 23/04/1990 च्या निर्णयानूसार जिल्हास्तरावर पर्यटन विषयक विकासाची कामे त्वरेने हाती घेणे शक्य व्हावे व त्याची अंमलबजावणी प्राधान्याने व्हावी म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तर पर्यटन संबंधी समितीची स्थापना करण्यांत आली. दिनांक 03/06/2004 च्या शासन निर्णयान्वये **जिल्हा नियोजन अधिकारी** हे या समितीचे सदस्य सचिव असतात.

**योजनेची कार्यप्रणाली :-**

1) या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र पर्यटक विकास महामंडळामार्फत करण्यांत येते.
2) जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती पर्यटन विकास महामंडळ मार्फत आपला प्रस्ताव सादर करते.
3) सह-व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ हे राज्यस्तरीय समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतात.
4) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या पहिल्या 3 महिन्यात ( जून अखेरपर्यत ) जिल्हा समितीकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यांत येते या 3 महिन्यात जिल्हा परिषदेकडून प्रस्ताव झाल्यास प्रकल्पाची निवड प्रत्यक्ष राज्य समिती करते.
5) प्रादेशिक पर्यटन योजनेच्या प्रस्तावातील कामांसाठी राज्यस्तरीय समितीने मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्र विकास महामंडळ अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यांत येतो.

**प्रादेशिक पर्यटन विकास आराखडा तयार करतांना खालील बाबींचा विचार करण्यांत येतो. :-**

1) ऐतिहासिक व वारसा स्थळांचे जतन करणे त्याचप्रमाणे लोककला व हस्तकला यांचे जतन करणे.
2) पर्यटन विकासाचे माध्यमातून रोजगार निर्मितीसाठी वाव तयार करणे.
3) पर्यटन स्थळांपर्यंत जाण्यासाठी योग्य रस्ते तयार करणे.
4) पर्यटन स्थळांचे ठिकाणी पिण्याचे पाणी उपलब्ध करणे.

5) वैद्यकीय सुविधा निर्माण करणे.
6) पर्यटन स्थळांच्या ठिकाणी आवश्यकतेनूसार विद्युतीकरण करणे.
7) पर्यटनाच्या ठिकाणी पर्यटक, निवास हॉटेल्स, इ. सुविधा निर्माण करणे.
8) इको टुरिझम योजना राबविणे.
9) लोकांमध्ये पर्यटनाची आवड निर्माण करणे, यासाठी शाळा/ महाविद्यालये, यांचा सहभाग करुन घेणे व प्रसिदधी माध्यमातून प्रचार करणे, माहिती/ मार्गदर्शक पुस्तिका तयार करणे, फलक लावणे इत्यादी.
10)जलक्रिडा केंद्रातून पर्यटनाचा विकास साधणे.
11)स्थानिक युवकांना/ आदिवासी युवकांना गाईड म्हणून प्रशिक्षीत करणे.
12)खाजगी संस्थांना सहभाग करुन घेणे.

## लेखाशिर्ष 2515-1238 लोकप्रतिनिधींची सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधांची कामे.

**प्रस्तावना :-**

मा. लोकप्रतिनिधींची सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत, रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधांच्या कामांसाठी शासनाने विशेष सुविधांची कामे विचारात घेवून निकष प्रमाणे ठरविले आहे. सदर कामे शासनाने सुचविल्यानूसार लोकप्रतिनिधींकडून प्राप्त मागणीपत्र/ प्रस्ताव सर्व पंचायत समिती, खंड विकास अधिकारी यांचे कडून विहित नमुन्यात कार्यक्रम मागवून व जिल्हा परिषद स्तरावर तयार करुन एकत्रित प्रस्ताव शासनास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यांचे स्वाक्षरीने कार्यवाही करुन मंजुरीकरिता शासनास सादर करण्यांत येते.

सदर मा. लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेले मागणीपत्र/ प्रस्ताव या सर्वांचा विचार करण्यांत येवून कामांच्या निकडीनूसार तसेच निधीच्या उपलब्धतेनूसार मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांसाठी निधी मंजूर करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यांत येतो.

त्यानंतर जिल्हा परिषदेने शासनास प्रस्ताव पाठविल्यानंतर शासन प्रस्तावावर छाननी करुन सदर प्रस्तावित कामाला मंजुरी करतो.

**योजनेची कार्यपद्धती :-**

### सदर योजनेंतर्गत पुढील कामे विचारात घेण्यांत येतात :-

गावांतर्गत रस्ते, गटारे, पाऊसपानी निचरा (Storm Water Drainage) दहनभूमी व दफनभूमीची सुधारणा करणे, संरक्षक भिंत, ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे, आठवडी बाजारासाठी सुविधा, गावामध्ये कचरा, डेपोसाठी व प्राथमिक प्रक्रियेसाठी सुविधा, सार्वजनिक जागेत वृक्ष लागवड व त्यांचे संरक्षण, सामाजिक सभागृह/ समाज मंदिर, सार्वजनिक शौचालये, रस्त्यांवर पेव्हिंग ब्लॉक बसविणे, व्यायामशाळा/ आखाडा बांधकाम करणे, प्रवासी निवारा शेड, वाचनालय बांधकाम करणे, नदीघाट बांधकाम करणे, बगीचे व सुशोभीकरण, पथदिवे, चौकाचे सुशोभिकरण व अन्य मुलभूत बाबी इत्यादी कामे या योजनेंतर्गत घेण्यांत येतात.

सदर मा.लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या कामांना शासन स्तरावर मंजूरी दिल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कडे निधी वितरीत करण्यांत येतो. त्यानंतर सदर रक्कम मंजूर केल्यानंतर कामांकरिता खर्च करण्यासाठी कार्यान्वित यंत्रणा यांना निधी वितरीत केला जातो.